**प्रेसनोट** दि. २१/०३/२०२३

पिंपरी-चिचवड महानगरपालिकेतील निविदा विभागातील लिपिकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३४ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | दिलीप भावशिंग आडे, वय ५१ वर्ष, पद - अनुरेखक (निविदा विभागातील लिपिक) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०५,०००/- रुपये, तडजोडीअंती १,००,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २१/०३/२०२३ |
| सापळा दिनांक | २१/०३/२०२३ |

ठिकाण :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यालय, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे देखभाल दुरुस्तीचे कामे करतात, त्यांना शासकीय निविदेनुसार काम मिळाले होते. सदर कामाच्या वर्क ऑर्डरची फाईल तयार करुन संबंधीत विभागाकडे पाठविण्यासाठीचा मोबदला म्हणून लोकसेवक दिलीप आडे यानी १,०५,०००/- रुपयांची (एक लाख पाच हजार रुपये) लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक दिलीप आडे यांनी तक्रारदार यांचेकडे १,०५,०००/- रुपयांची मागणी करुन तडजोडीअंती १,००,०००/- रुपयांची (एक लाख रुपये) मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारल्यावर लोकसेवक आडे याना ताब्यात घेण्यात आले असून, पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे युनिट.